संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई या पदावर पदोन्नती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन आदेश क्रमांक : इएसटी-१११७/प्र.क्र.८७/का.१४२७

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: - २१ मे, २०१८

<u>वाचा :</u>- सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्रमांक - ईएसबी १११८/प्र.क्र.४०/१३, दिनांक २६/४/२०१८.

शासन आदेश

श्री.र.र.शिंगे, अपर संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांची आस्थापना मंडळ क्रमांक २ च्या दिनांक २३/४/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत केलेल्या शिफारशीनुसार, "संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई" (सुधारीत पे बँड ३७,४००-६७,००० + ग्रेड पे रुपये ८९००/-) या रिक्त पदावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येत आहे. सदर नियुक्ती ही खाली नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे.

अ) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई हे पदोन्नतीचे पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील असल्याने, निवडसूची/पदोन्नती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेने नियमित केल्यानंतर श्री.र.र.शिंगे, अपर संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई हे पदोन्नतीच्या पदावर सेवाज्येष्ठता व अन्य सेवाविषयक लाभ मिळण्यास पात्र राहतील.

आ) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई या पदावर या आदेशाद्वारे श्री.र.र.शिंगे, अपर संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांची पदोन्नतीने नियुक्ती करताना त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही असे प्रमाणित करण्यात येत आहे.

इ) सामान्य प्रशासन विभाग (साविस), पत्र क्रमांक - बीसीसी २०१७/प्र.क्र.३१२A/१६ब, दिनांक २९/१२/२०१७ अन्वये - "मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक २७९७/२०१७ (स्टॅम्प क्रमांक - ७२५६/२०१५) महाराष्ट्र राज्य विरुध्द श्री.विजय घोगरे व इतर तसेच इतर संलग्न न्यायालयीन प्रकरणात दिनांक ४/८/२०१७ रोजी अंतिम निर्णय दिलेला असून या विरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ प्रलंबित आहे. तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्णयास मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती देण्याबाबत अथवा परिस्थिती "जैसे थे" ठेवण्याबाबत कोणतेही आदेश पारित केलेले नाहीत. या परिस्थितीत पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाज्येष्ठता यादीतील मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी, ते दिनांक २५/५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेले नाहीत, याची खात्री सर्व प्रशासकीय विभागानी करावी," असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे श्री.र.र.शिंगे, अपर संचालक, मुंबई यांना या आदेशाद्वारे पदोन्नतीनंतर देण्यात आलेली नियुक्ती मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित

असलेल्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ मधील अंतिम निर्णयास अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०५२११५३९५६१४१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Pradnya S Mahale

Digitally signed by Pradnya S Mahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=31c8683f52ccbefd97bce49983c4151d2caf1c185c657ea855ac85f31e5f681e, cn=Pradnya S Mahale
Date: 2018.05.21 17:52:33 +05'30'

(प्रज्ञा महाले)
उप सचिव ,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री / मा.मंत्री (नियोजन)/मा.राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव
२) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
३) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२
४) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
५) सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय,
६) सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर
८) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर
९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
यांना विनंती करण्यात येते की, श्री.र.र.शिंगे, अपर संचालक यांच्या तात्पुरत्या पदोन्नतीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेसाठीचा प्रस्ताव त्वरीत सादर करावा.
१२) श्री.र.र.शिंगे, अपर संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१३) सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, कोकण विभाग/ पुणे/ नाशिक/नागपूर/औरंगाबाद / अमरावती
१४) उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय, कोकण विभाग / पुणे/ नाशिक / नागपूर/ औरंगाबाद / अमरावती
१५) सामान्य प्रशासन विभाग (का.१३), मंत्रालय, मुंबई
१६) सर्व सह / उप सचिव / विशेष कार्य अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) लेखा अधिकारी (लेखा शाखा), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई (२ प्रती)
१८) कार्यासन अधिकारी (का.१४१७/का.१४२६), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) निवड नस्ती.